सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग,जि.रायगड.
जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीचरोड,अलिबाग.जि.रायगड
Email- deangmcalibag@gmail.com Phone No.02141-299214 www.gmchalibag.in/gmch

जा.क्र.शावैमअ/कंत्राटी/सहा.प्राध्या/आस्था-१-२/ १८३८ /२०२२ दिनांक. ०२.०८.२०२२

वेबसाईट व्दारे प्रसिध्दी (www.gmchalibag.in/gmch)

# "जाहिरात"

विषय - सहाय्यक प्राध्यापकांची रिक्तपदे कंत्राटी **walk-in interview** तत्त्वावर भरण्याबाबत.

संदर्भ - शासन निर्णय क्र.वेतनी-२०१९/प्र.क्र.०३/२०१९/वैसेवा-२, दि. ३१.१२.२०२०.

अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड हे त्यांच्या आस्थापनेवर रिक्त असलेली पदे भरण्याकरीता नमूद केलेल्या अचिकित्सालयीन व चिकित्सालयीन विषयांतील सहाय्यक प्राध्यापकांची गट-ब पदे कंत्राटी **walk-in interview** तत्वावर भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून खालील नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

तरी इच्छुक उमेदवारांनी सोबत जोडलेला विहित नमुन्यातील अर्ज संपूर्ण शैक्षणिक तपशिलासह आवश्यकत्या कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतीसह उपनिर्दिष्ट पत्त्यावर सदरील जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून गुरुवार, दि.०४/०८/२०२२, शुक्रवार, दि. ०५/०८/२०२२ व सोमवार, दि.०८/०८/२०२२ रोजी सकाळी १० ते सांयकाळी ५ वाजेपर्यंत स्वहस्ते सादर करावा.

मूळ प्रमाणपत्रांसह सकाळी १०.०० ते सांय. ०५.०० या वेळेत अधिष्ठाता यांचे दालन, पहिल्या माळा, जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग-रायगड येथे स्वत: मुलाखतीकरीता/मूळप्रमाणपत्रांच्या पडताळणी करीता उपस्थित रहावे. मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास उमेदवाराचा कंत्राटी नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही. सद्यस्थितीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड येथे १२० दिवासांच्या कंत्राटी तत्त्वावर सेवेत कार्यरत असलेल्या सहाय्यक प्राध्यापकांनी त्यांच्या तात्पुरत्या नियुक्ती पुढे सुरु राहण्याकरीता या प्रक्रियेत सहभागी होणे बंधनकारक राहील. सदरील प्रक्रियेत उपस्थित न राहिल्यास त्यांचा पुढील तात्पुरत्या / कंत्राटी नियुक्ती करीता विचार करण्यात येणार नाही.

सोबत रिक्तपदांचा तक्ता जोडला असून, रिक्त जागांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता असल्याने सदरील रिक्तपदांच्या संख्येत बदल करण्याचे अधिकार प्रशासनास राहतील. सर्व जाहीर केलेल्या रिक्त पदासाठी मुलाखती घेण्यात येत असून, रिक्त पदाच्या उपलब्धते प्रमाणे प्रथम निवड झालेल्या पात्र उमेदवारांना नियुक्तीने आदेश देण्यांत येतील व तदनंतर रिक्तपद उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचा गुणवत्तेप्रमाणे विचार करण्यात येईल.

उमेदवाराची कागदपत्रे परिपूर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. जर उमेदवार एका विषयापेक्षा जास्त विषयासाठी अर्ज सादर करावयाचा असेल तर प्रत्येक विषयासाठी वेगळा अर्ज सादर करावा.

**नियम व अटी -**

**१.वेतनश्रेणी -** सदरील उमेदवारांना दिनांक ३१/१२/२०२० च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष फक्त ) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहिल. सदरील वेतन संस्थेत मंजूर असलेल्या मूळ अनुदानातून १० कंत्राटी सेवा या उदिष्टामधून भागविण्यात येईल.

२. **वयोमर्यादा -** सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारांचे वय ४० वर्षापेक्षा अधिक असणार नाही, परंतू जे उमेदवार अगोदर शासनाच्या सेवेत असतील अशा उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करता येईल. मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यांदा ५ वर्षापर्यंत शिथित राहिल.

३. **गुणवत्ता-** गुणवत्ता यादी ही पदव्युत्तर पदवी परिक्षेच्या एमडी/एमएस/एमसीएच/डिएम/किंवा समतुल्य अर्हता प्राप्त परीक्षेच्या गुणांवर ठरविण्यात येईल. संशोधन लेख (शोधनिबंध), राज्य व अखिल भारतीय स्तरावरील परिषदेतील सहभाग याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

४.ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असताना सतत जास्त कालावधी पर्यंत गैरहजर असल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.

५.उमेदवाराची निवड करताना तसेच ज्या उमेदवारांना बंधपत्रित कालावधी पूर्ण करावयाचा आहे त्यांना प्राधान्य देण्यात येईल. तदनंतर ज्या उमेदवारानी या संस्थेतून/शासकीय/निमशासकीय संस्थेतून बंधपत्रिक सेवा (पीजी बॉन्ड) पूर्ण केला आहे, अशा उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

६.सदर पदांकरीता उमेदवारांची नियुक्ती १२० दिवसांसाठी कंत्राटी स्वरुपात राहील. १२० दिवसानंतर रिक्तपद उपलब्ध असल्यास तांत्रिक खंड देऊन पुन्हा १२० दिवासांसाठी नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल. सदरील नियुक्तीच्या दरम्यान महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शासनाकडुन नियमित अथवा बदलीने उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी तत्वावरील उमेदवाराची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

७. निवड झालेल्या उमेदवारास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड व संलग्ण रुग्णालयात नेमणून केली जाईल.

८.सदरील तात्पुरत्या कंत्राटी नियुक्तीकरीता किमान ०१ वर्षाचा सिनियर रेसिडेंट पदावरील अनुभव प्राप्त असणे आवश्यक आहे.

९. अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या छायाप्रती सांक्षाकित करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.  नंतर कोणतीही कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

१०.( अ) प्रथम, व्दित्तीय व तृत्तीय वर्ष एम.बी.बी.एस तसेच एम.डी, एम.एस, डी.एम., एमसी.एच किंवा समतुल्य या सर्व परीक्षेची गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्रे गुणपत्रिका नसल्यास परीक्षा पॉईट, ग्रेड प्रमाणपत्र,  ( ब) सर्व पदवी, पदवीका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतिम वर्षाची गुणपत्रिका (क) एम.एस.सी किंवा एन.एम.सी. नुतनीकरण केलेले नोंदणी प्रमाणपत्र  (ड) जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र व आवश्य असल्यास नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र. (ई) जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला. (फ) एक वर्ष सिनियर रेसिडेंट पदाचे अनुभव प्रमाणपत्र. (ग) पॅनकार्ड व आधारकार्डची छायांकित प्रत इत्यादी कागपत्रे/प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

( डॉ.संजय सोनुने )
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अलिबाग-रायगङ.

प्रति,

१.सर्व संबंधित विभाग प्रमुख, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग- रायगङ.

२.सूचना फलक, अधिष्ठाता कार्यालय/विद्यार्थी वसतीगृह/मुलींचे वसतीगृह/ मध्यवर्ती ग्रंथालय, शा.वै.म.अलिबाग.

३.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई, पुणे,सोलापूर, कोल्हापुर, मिरज, औरंगाबाद, नांदेड, लातुर, अंबाजोगाई,यवतमाळ,अकोला,चंद्रपुर,नागपुर,गोंदिया, जळगाव,नंदुरबार, सातारा, सिंधुदुर्ग.

प्रत- माहितीसाठी सविनय सादर.

१.मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,९ वा माळा,नवीन मंत्रालय,मुंबई. ४०० ००१.

२.मा.आयुक्त (वै.शि) वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई. ४०० ००१.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड.

(उमेदवाराची माहिती)

| पासपोर्ट साईज फोटो |
|---|

विषय :- ________________________________

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | | |
|---|---|---|---|
| १. | उमेदवार सध्या कोठे कार्यरत आहे.<br>शासकीय/ निमशासकीय/अशासकीय (MUHS/NON MUHS) | | |
| २. | जन्म दिनांक व दिनांक ०१.०८.२०२२ रोजी असलेले वय . | | |
| ३. | एम.बी.बी.एस. पदवी परीक्षा उत्तीर्ण तपशील.<br>(Name of Institute and Year) | | |
| ४. | एम.बी.बी.एस. पदवी परीक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण केली (UG Attempt) व एम.बी.बी.एस. अंतिम वर्षांचे गुण. | | Marks |
| ५. | एम.डी./ एम.एस. पद्व्युत्तर  परीक्षा उत्तीर्ण तपशील<br>(Name of Institute and Year) | | |
| ६. | एम.डी./एम.एस./डी.एन.बी/पदवी परीक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण केली (PG Attempt) व एम.डी./ एम.एस. अंतिम वर्षांचे गूण | | Marks |
| ७. | इतर पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण केल्याचा तपशील<br>(DM/Mch.) | | |
| ८. | महाराष्ट्र मेडिकल कॉन्सील, मुंबई रजिस्ट्रेशन<br>(रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राचा कालावधी) | | |
| ९. | सिनिअर रेसिडेंट पदाचा अनुभव<br>(दिनांक नमूद करावे) | | |
| १०. | शोधनिबंध / परिषद प्रसिध्द केले असल्यास संख्या नमूद करावी (International/National) | International - | National – |
| ११. | उमेदवाराचे मोबाईल क्रमांक | | |
| १२. | उमेदवाराचे ई-मेल आयडी क्रमांक | | |
| | आधार कार्ड क्रमांक | | |
| १३. | सध्या या संस्थेत १२० दिवसांच्या कंत्राटी सेवेत कार्यरत आहात का ? केव्हापासून दिनांक नमुद करावा. | | |

उमेदवाराची स्वाक्षरी :.............................................................

दिनांक : .......................................................... शेरा- पात्र / अपात्र :..........................................................

..........................................................................................................................................................

# शासकिय वैद्यकिय महाविद्यालय अलिबाग-रायगड,

सहाय्यक प्राध्यापक रिक्त कंत्राटी पदांकरिता वॉकिंग इंटरव्यु तत्वावर भरण्याबाबत पदांचा तपशिल.

| अ.क्र | विभागाचे नांव | रिक्त पद संख्या | SC १३% | ST ७% | VJ ३% | NT - 1 २.५% | NT -2 २ % | NT-3 ३.५ % | SBC २ % | OBC १९% | EWS १० % | OPEN ३८ % | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शरीररचनाशास्त्र | ०२ | ०१ | – | – | – | – | – | – | – | – | ०१ | ०२ |
| २ | शरीरक्रियाशास्त्र | ०२ | – | ०१ | – | – | – | – | – | – | ०१ | – | ०२ |
| ३ | जीवरसायनशास्त्र | ०२ | – | – | ०१ | – | – | – | – | – | – | ०१ | ०२ |
| ४ | औषधशास्त्र | ०२ | – | – | – | ०१ | – | – | – | – | ०१ | – | ०२ |
| ५ | शरीरविकृतीशास्त्र | ०३ | ०१ | – | – | – | ०१ | – | – | ०१ | – | – | ०३ |
| ६ | सुक्ष्मजीवशास्त्र | ०२ | – | – | – | – | – | – | – | ०१ | – | ०१ | ०२ |
| ७ | न्यायवैद्यकशास्त्र | ०१ | – | – | – | – | – | – | ०१ | | – | – | ०१ |
| ८ | जनऔषधवैद्यकशास्त्र | ०४ (३+१*) | – | – | – | – | – | ०१ | | ०१ | – | ०२ | ०४ |
| | एकुण | १८ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०३ | ०२ | ०५ | १८ |

*सांख्यिकी

अधिष्ठाता,
शासकिय वैद्यकिय महाविद्यालय,
अलिबाग-रायगड.